# शिक्षणमहर्षी अन् बहुआयामी नेते 'कै. बाळासाहेब वाघ'

श्रद्धांजली



**बाळासाहेब** वाघ म्हणजे केवळ एक व्यक्तिमत्त्व नव्हे, तर कृषी, शिक्षण, सहकार, अर्थकारण आणि समाजकारण या परस्परांशी निगडित क्षेत्रांतील समर्पित कार्याचा जिवंत आदर्श होते. अनेकजण एखाद्या एका क्षेत्रात कार्य करतात; मात्र बाळासाहेबांनी या सर्व क्षेत्रांत निःस्वार्थ भावनेने कार्य करून संपूर्ण परिसराचा सर्वांगीण विकास साधला, हे त्यांचे वैशिष्ट्य ठरते.

बाळासाहेबांशी बोलताना आदरयुक्त भीती वाटत असे. प्रत्येक निर्णय घेण्यापूर्वी त्या विषयाचे अर्थशास्त्र, व्यावहारिक बाजू आणि दीर्घकालीन परिणाम यांचा सखोल अभ्यास करण्याची त्यांची कार्यपद्धती होती. कृषी अधिकारी, साखर कारखान्याचे सचिव व अध्यक्ष, महाराष्ट्र सिंचन आयोगाचे सदस्य, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे सदस्य, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, तसेच विनाअनुदानित अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयांच्या व्यवस्थापन संघटनांचे अध्यक्ष अशा बहुआयामी भूमिका त्यांनी समर्थपणे निभावल्या.

महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या व्यवस्थापनांची संघटना उभी करून जवळपास दीडशे महाविद्यालयांना एकत्र आणण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले.

या संघटनेमुळे तंत्रशिक्षण क्षेत्रातील समस्या सरकारदरबारी प्रभावीपणे मांडल्या जाऊ लागल्या आणि तंत्रशिक्षणाच्या विकासाला दिशा मिळाली. अखिल भारतीय पातळीवरील संघटनेत उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी ठसा उमटविला.

(वा. प्र.)

“

नेतृत्व करताना सर्वांच्या मतांचा सन्मान, योग्य व्यक्तीवर योग्य जबाबदारी सोपविण्याची अचूक जाण आणि निर्णयक्षमतेची स्पष्टता हे त्यांचे गुण होते. साधेपणा, आपुलकी आणि अहंकारशून्य वर्तनामुळे ते सर्वांचे 'भाऊ' बनले. जलसंधारण क्षेत्रात लोकवर्गणीतून उभारलेले बंधारे आणि सिंचन आयोगातील योगदानामुळे ते 'महाराष्ट्राचे जलनायक' म्हणून ओळखले जातात.

**डॉ. शशिकांत हलकुडे, उपाध्यक्ष असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंट्स ऑफ अनएडेड प्रोफेशनल कॉलेज (महाराष्ट्र)**